# स्त्री अत्याचाराविरोधात तनिष्कांची जनजागृती

स्त्री प्रतिष्ठा अभियान
तनिष्का
व्यासपीठ
९२२५८००८००

## स्वयंसेवी संस्थेच्या सहकार्याने पथनाट्याचे सादरीकरण




**भोईवाडा : परळ-भोईवाडा गटाच्या तनिष्कांसोबत विदेशी पत्रकार महिला.** **(छायाचित्र : मुकेश धावडे)**

वडाळा, ता. ६ (बातमीदार) : स्त्रियांवरील अत्याचारांत दिवसेंदिवस वाढ होत चालली आहे. त्याविरोधात समाजात जनजागृती घडविली पाहिजे. या उद्देशाने परळ-भोईवाडा तनिष्का गटाने 'मावा' या स्वयंसेवी संस्थेच्या सहकार्याने भोईवाड्यातील डॉ. डी. बी. कुलकर्णी विद्यालयाच्या परिसरात महिलांवर होणाऱ्या अत्याचारांवर आधारित पथनाट्याचे सादरीकरण केले. या वेळी अंब्रिता ढवळे, शेरीन डेनिअल, सोनाली मोहिते, प्रज्ञा जाधव, रेणुका पवार, लीना शिंदे आदी तनिष्कांसह नॉर्वेतील पत्रकार महिला करी ॲंसे, अन्नेमॉर लार्सन, 'मावा' संस्थेचे मानद सचिव हरिश सदानी आणि महाविद्यालयीन विद्यार्थी उपस्थित होते.

'स्त्री जन्माचा करू या स्वीकार तरच घेईल समाज आकार', 'लिंग निवड नका करू; मुलगा-मुलगी समान धरू', 'सोच सही मर्द वही... औरत पर हाथ उठाना मर्दानगी नही,' आदी एक ना अनेक घोषणा देत परळ-नायगाव परिसरात रॅली काढण्यात आली. मावा संस्थेच्या स्वयंसेवकांनी पथनाट्य सादर केले. महिलांवर होणाऱ्या अत्याचारांवर चर्चा करीत बसण्यापेक्षा सरकारने कठोर पावले उचलावीत आणि कायद्यात कोणत्याही पळवाटा न ठेवता गुन्हेगाराला सक्तीची शिक्षा द्यावी, अशी मागणी तनिष्कांनी केली. असे केले तरच अत्याचारांचे प्रमाण कमी होईल, असे तनिष्का म्हणाल्या.पुरुषप्रधान व्यवस्था स्त्रियांना दुय्यम मानते. त्यामुळे पुरुषांनी स्त्रियांना नियंत्रणात ठेवण्यासाठी हिंसा करणे योग्यच आहे, असे समजले जाते. कोणत्याही स्वरूपातले हिंसेचे स्त्रियांवर दूरगामी परिणाम होतात. या हिंसाचाराविरुद्ध समाजातील प्रत्येक व्यक्तीने पुढाकार घेणे गरजेचे आहे, असे तनिष्कांनी सांगितले.



**महिला अत्याचाराविरोधात पथनाट्य सादर करताना कार्यकर्ते.**

### विदेशी पत्रकारांकडून कौतुक

**पथनाट्याच्या सादरीकरणावेळी विदेशी महिला पत्रकार उपस्थित होत्या. त्यांनी तनिष्का राबवत असलेल्या उपक्रमांचे कौतुक केले.**